एक-दोन नव्हे, महिलेने दिला चक्क ४ बाळांना जन्म! घरातच झाली प्रसूती >>पान 2

न्यायालयात 'विनयभंग' आणि 'असहाय महिला' यांसारख्या शब्दांवर बंदी; न्यायाधीशांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी >>पान 3

बुलढाण्यातील माईस प्रकल्प आणि सिंदखेड राजा येथील जिजाऊ सृष्टी उभारणीला गती देणार : मंत्री शंभूराज देसाई >>पान 4

सुविचार

काही लोक प्रेरणा देतात, तर काही शिकवण

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 23 ■ शुक्रवार, दि. 07 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



आकांक्षा चमोलानं लॉक अप २च्या एलिमिनेशननंतर गौरव खन्नासोबत घटस्फोट घेणार असल्याची केली पुष्टी

आतील पान

# राज्यात पशुधन विमा योजना लागू : मंत्री पंकजा मुंडे

## शेतकऱ्यांना मिळणार ८५ टक्के प्रीमियम अनुदान

■ अपघात, नैसर्गिक आपत्ती व रोगामुळे पशुधन मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण

■ प्रत्येक कुटुंबातील १० पशुधन घटकांस मिळणार लाभ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत राज्यात पशुधन विमा योजना राबविण्यास सरकारने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे. या योजनेमुळे पशुपालक शेतकऱ्यांना अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा रोगामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास आर्थिक संरक्षण मिळणार असल्याची माहिती पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. यासंदर्भात अधिक माहिती देताना पशुसंवर्धन पंकजा मुंडे यांनी सांगितले की, हवामानातील अनपेक्षित बदल, नैसर्गिक आपत्ती, विषबाधा, सर्पदंश, दूषित पाणी, अपघात तसेच लम्पी स्कीनसारख्या साथीच्या रोगांमुळे पशुधनाचे मोठे नुकसान होते. त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक स्थैर्य टिकविणे, त्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळणे आणि कर्जबाजारी होण्यापासून संरक्षण मिळावे या उद्देशाने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.



अपघात, पूर, वीज पडणे, दुष्काळ, वादळ, वणवा, उष्णतेची लाट, भूकंप अशा नैसर्गिक आपत्ती, नैसर्गिक मृत्यू किंवा रोगामुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास विमा संरक्षण लागू राहील. मात्र पशुधनाचे पूर्ण किंवा अंशतः अपंगत्व तसेच वाहतूक जोखीम या योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. शेळी व मेंढ्यांचे विमा संरक्षण महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक हद्दीतच लागू राहील.

**दहा पशुधन घटकांस मिळणार लाभ**

या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत करण्यात येणार आहे. देशी व संकरित दुधाळ गायी, म्हशी, बैल, रेडे तसेच शेळ्या आणि मेंढ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक कुटुंबाला कमाल १० पशुधन घटकापर्यंत या योजनेचा लाभ मिळणार असून त्यापेक्षा अधिक पशुधनाचा विमा काढायचा असल्यास अतिरिक्त पशुधनाचा संपूर्ण प्रीमियम लाभार्थ्यालाच भरावा लागणार आहे. योजनेत दुधाळ गायीसाठी कमाल ७० हजार रुपये, म्हशीसाठी ८० हजार रुपये, बैलासाठी ७० हजार रुपये, रेड्यासाठी ८० हजार रुपये आणि शेळी अथवा मेंढीसाठी ७ हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात येणार आहे. लाभार्थी आपल्या इच्छेनुसार एक, दोन किंवा तीन वर्षांसाठी विमा संरक्षण घेऊ शकणार आहेत.

विमा प्रीमियमचा दर एका वर्षासाठी ४.३० टक्के, दोन वर्षांसाठी ७.५० टक्के आणि तीन वर्षांसाठी १०.५० टक्के निश्चित करण्यात आला आहे. या प्रीमियमपैकी ८५ टक्के हिस्सा केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अनुदान स्वरूपात दिला जाणार असून उर्वरित १५ टक्के रक्कम लाभार्थ्यांना भरावी लागणार आहे. पशुधनाची विमा रक्कम चालू बाजारभावानुसार निश्चित केली जाणार असून त्यासाठी पशुपालक, विमा कंपनी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त मूल्यांकन होईल. दुधाळ जनावरांच्या बाबतीत दूध उत्पादनाच्या आधारे किंमत निश्चित करण्यात येणार आहे.

**पशुधनाचा मृत्यू झाल्यास कंपनीला २४ तासाच्या आत माहिती द्या**

पशुधनाचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला मोबाईल ॲप, संकेतस्थळ, ई-मेल, फोन किंवा पत्राद्वारे माहिती देणे आवश्यक राहील. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करावा लागेल. 'नो टॅग, नो क्लेम' ही अट लागू राहणार असून नैसर्गिक आपत्तीमधील मृत्यूला त्यातून सूट असेल. योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुधनाची १२ अंकी इअर टॅगद्वारे राष्ट्रीय डिजिटल पशुधन प्रणालीवर नोंद असणे तसेच शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे आरोग्य प्रमाणपत्र आवश्यक राहील. लाभार्थ्यांनी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा बँक पासबुक यापैकी ओळखपत्र, इअर टॅग स्पष्ट दिसणारे पशुधनाचे छायाचित्र, पशुपालकासोबतचे छायाचित्र आणि आरोग्य प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**मृत्यू दावा १५ दिवसाच्या आत**

सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत दावा थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा करणे बंधनकारक राहील. १५ दिवसांनंतर विलंब झाल्यास लाभार्थ्याला वार्षिक १२ टक्के व्याजदराने अतिरिक्त भरपाई द्यावी लागणार आहे. दावा नाकारल्यास त्याचा पुनर्विचार करण्यासाठी प्रादेशिक आणि राज्यस्तरीय समित्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. दाव्यांच्या नोंदणीसाठी आणि जलद निकाली काढण्यासाठी विमा कंपनीकडून मराठी व इंग्रजी भाषेतील ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार असून जिल्हास्तरावर मदत कक्ष, ग्राहक सेवा क्रमांक आणि तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध करून दिली जाणार आहे. योजनेचा प्रचार दूध संकलन संस्था, गो-मित्र आणि पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून केला जाणार आहे.

पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर पशुधनाची ओळख, आरोग्य तपासणी, बाजारमूल्य निश्चिती, टॅगिंग, आरोग्य प्रमाणपत्र आणि मृत्यूनंतर शवविच्छेदन अहवाल ७२ तासांत सादर करण्याची जबाबदारी राहणार आहे, अशी माहिती मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

## 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यिक, 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी (श्री.वि.) यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वातील एक संवेदनशील, अभ्यासू आणि व्रतस्थ साहित्यिक हरपल्याची शोक भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. शोकसंदेशात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणतात, श्री.वि. कुलकर्णी यांनी आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्ती, निसर्गप्रेम आणि जीवनातील साध्या अनुभवांना असामान्य साहित्यिक अभिव्यक्ती देत मराठी ललित साहित्य समृद्ध केले.

डोह, मनातल्या उन्हात, सोन्याचा पिंपळ, पाण्याचे पंख आणि कोरडी भिक्षा यांसारख्या साहित्यकृतींनी मराठी वाचकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला. 'मौज' या प्रतिष्ठित नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनी अनेक नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेला नवे आयाम दिले. साहित्यावरील त्यांची निष्ठा, संवेदनशीलता आणि साधेपणा भावी पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील.

श्री.वि. कुलकर्णी यांच्या निधनाने मराठी साहित्य क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली असल्याची शोक भावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानातून राष्ट्रप्रेमाचा जागर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विशेष प्रभात फेरीचे आयोजन रविवार, ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० ते ९.३० या वेळेत भारतीय विद्या भवन ते ऑगस्ट क्रांती मैदान, मुंबई या मार्गावर करण्यात आले आहे. या प्रभात फेरीत नागरिक, युवक, विद्यार्थी, विविध सामाजिक संस्था आणि सांस्कृतिकप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी यांनी दिलेल्या 'चले जाव' आंदोलनाच्या हाकेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला निर्णायक दिशा मिळाली. ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्याग, संघर्ष, शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देणारा ऐतिहासिक दिवस आहे. या दिवसाचे स्मरण करत स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला अभिवादन करणे; तसेच प्रत्येक नागरिकामध्ये राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे, हा या प्रभात फेरीमागील प्रमुख उद्देश आहे.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवावा, तिरंग्याविषयी आदर आणि राष्ट्रीय अस्मितेची भावना अधिक बळकट व्हावी तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचे स्मरण भावी पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने या प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. देशभक्तीपर जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, ऑगस्ट क्रांतीचे महत्त्व, तिरंग्याचा सन्मान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना जनमानसात अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

# मेहकर दिवाणी न्यायालयातील बेलिफ एसीबीच्या जाळ्यात; लाच स्वीकारताना रंगेहात अटक

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर । प्रतिनिधी :** मालमत्ता जप्तीचे न्यायालयीन वॉरंट बजावू नये तसेच ते परत करण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मेहकर येथील दिवाणी न्यायालयातील बेलिफला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे मेहकरच्या न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार (वय ५३, व्यवसाय शेती) यांच्याविरुद्ध मेहकर दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा प्रलंबित आहे. या प्रकरणात न्यायालयाने जंगम मालमत्ता जप्तीचे वॉरंट काढले होते. हे वॉरंट बजावू नये आणि ते न बजावता परत करण्यासाठी न्यायालयातील बेलिफ जगदीश सुखदेव राजूत (वय ३१) यांनी सुरुवातीला १५ हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीनंतर ही रक्कम १० हजार रुपयांवर निश्चित करण्यात आली.

तक्रारदाराने याबाबत एसीबी, बुलढाणा यांच्याकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी ६ ऑगस्ट रोजी करण्यात आली. त्यामध्ये आरोपीने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने नियोजनबद्ध सापळा रचला.

गुरुवारी दुपारी मेहकर बसस्थानक परिसरात तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना बेलिफ जगदीश राजूत याला एसीबीने रंगेहात ताब्यात घेतले.

आरोपी जगदीश सुखदेव राजूत हा दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), मेहकर येथे बेलिफ म्हणून कार्यरत असून त्याचे मूळ वास्तव्य माळीपुरा, (ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा) येथे असल्याचे एसीबीने सांगितले.

या प्रकरणी मेहकर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया वृत्तलेपर्यंत सुरू होती आरोपीला अटक करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली.

ही कारवाई एसीबी, बुलढाणा येथील पोलिस निरीक्षक रमेश पवार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलिस उपअधीक्षक भागोजी चोरमले यांनी कारवाईवर पर्यवेक्षण केले. या पथकाला अमरावती परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक बापू बांगर यांचे मार्गदर्शन लाभले.

कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडून लाचेची मागणी होत असल्यास अथवा भ्रष्टाचारासंदर्भात माहिती असल्यास नागरिकांनी तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस उपअधीक्षक भागोजी चोरमले यांनी केले आहे.

## मराठी साहित्यातील सेवाव्रती पांथस्थाने निरोप घेतला

**मुंबई । प्रतिनिधी :** मराठी साहित्यातील सेवाव्रती पांथस्थाने निरोप घेतल्याची शोकमग्न भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी ऊर्फ 'श्रीवि' यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या निधनाने मराठी साहित्य क्षेत्राची हानी झाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, औदुंबरसारख्या गावातून श्रीविंचा प्रवास सुरु झाला. औदुंबर परिसरावर त्यांचे चिरंतन प्रेम. हेच त्यांचे प्रेम सूक्ष्म निरीक्षणातून ललित लेखनाच्या रुपाने साहित्यात अजरामर झाले. ते खडतर परिस्थितीतून 'मौज' या प्रथितयश नियतकालिकाच्या संपादकपदापर्यंत पोहचले. सिद्धहस्त कवी म्हणून आणि ललित लेखनातून त्यांनी वाचक रसिकांचे रंजन केले. मनातल्या उन्हात, डोह, सोन्याचा पिंपळ, पाण्याचे पंख, कोरडी भिक्षा या ललित संग्रहांनी मने जिंकली. यातूनच त्यांची 'डोह'कार श्रीवि अशी ओळख निर्माण झाली.

मौजच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदितांना लिहीते केले. यामुळे मराठी वाचकांना सकस, दर्जेदार साहित्यकृतींची मेजवानी मिळाली. श्री.वि. कुलकर्णी यांच्या निधनामुळे मराठी साहित्याची व्रतस्थपणे सेवा करणाऱ्या मार्गदर्शक अशा व्यक्तिमत्त्वाला मुकलो आहोत.

# मेहकरात सराफी दुकानासह मेडिकलवर चोरट्याचा डल्ला

## शटर फोडून ऐवज लंपास, फिंगरप्रिंट तज्ज्ञांकडून तपास

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर। प्रतिनिधी :** मेहकर शहरातील तहसील चौक परिसरात एका अज्ञात चोरट्याने सराफी दुकानासह मेडिकलचे शटर फोडून चोरी केल्याची घटना ५ ऑगस्टच्या रात्री ते ६ ऑगस्टच्या पहाटेच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.







याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथील रहिवासी तथा सराफी व्यावसायिक चंद्रशेखर वसंतराव काटकर (वय ४७) यांचे तहसील चौक परिसरात श्रीकृष्ण ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. ५ ऑगस्ट रोजी रात्री साडेसात वाजता दुकान बंद करून घरी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने प्रथम चॅनल गेटचे लॉक तोडले. त्यानंतर शटरचे दोन्ही बाजूचे लॉक फोडून सेंटर लॉक उचकटत दुकानात प्रवेश केला.

दुकानातील काउंटरमध्ये ठेवलेल्या सुमारे ३५० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या तोरड्या (किंमत सुमारे ३९ हजार रुपये) तसेच व्हिजन कंपनीचा डीव्हीआर (किंमत ३ हजार रुपये) असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला.

याच परिसरातील विठ्ठल नगर येथील न्यू गजानन मेडिकलचेही शटर फोडून ड्रॉवरमधील सुमारे ४ हजार रुपयांची रोकड चोरट्याने लंपास केली. त्यामुळे दोन्ही घटनांमधील चोरीची एकूण रक्कम सुमारे ४६ हजार रुपये असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी चंद्रशेखर काटकर यांच्या तक्रारीवरून मेहकर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बीट अंमलदार राजेंद्र काळे (ब. नं. ९०२) करीत आहेत.

दरम्यान, तहसील चौक हा शहरातील अत्यंत गजबजलेला परिसर असून पोलीस ठाण्यापासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर ही चोरी झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दुकानमालकांच्या म्हणण्यानुसार, चोरीमुळे प्रत्यक्षात झालेले नुकसान सुमारे दीड लाख रुपयांपर्यंत आहे; मात्र पोलिसांकडे दाखल झालेल्या गुन्ह्यात ३९ हजार रुपयांच्या चांदीच्या दागिन्यांची नोंद करण्यात आली आहे. घटनास्थळी फिंगरप्रिंट तज्ज्ञांनी भेट देऊन पुरावे संकलित केले असून मेहकर पोलीस अधिक तपास करीत आहेत.



## विचारांची नाळ पक्की असावी...

विचारांची नाळ हा विषय केवळ वैयक्तिक जीवनापुरता मर्यादित नसून समाज, संस्कृती आणि राष्ट्राच्या भवितव्याशी जोडलेला आहे. जशी आईच्या गर्भात असताना बाळाची नाळ त्याला जीवनरस पुरवते, त्याचप्रमाणे विचारांची नाळ माणसाला जगण्याची प्रेरणा, निर्णय घेण्याची क्षमता आणि जीवनाचा खरा अर्थ समजावून देते. माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्याकडे कोणतेही विचार नसतात. त्याचे कुटुंब, संस्कार, शिक्षण, मित्रपरिवार, समाज आणि अनुभव यांच्या माध्यमातून त्याची विचारसरणी घडत जाते. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याला योग्य दिशा देण्यासाठी चांगल्या विचारांची साथ आवश्यक असते. ज्या घरात प्रेम, आदर, प्रामाणिकपणा आणि माणुसकीचे संस्कार दिले जातात, त्या घरातील मुलांची विचारांची नाळ समाजहिताशी जोडली जाते. उलट चुकीचे संस्कार, द्वेष, लोभ आणि अहंकार यांच्या प्रभावाखाली वाढलेली विचारसरणी व्यक्तीला चुकीच्या मार्गावर नेऊ शकते. इतिहास पाहिला तर महान व्यक्तींनी आपल्या विचारांच्या बळावर समाजात परिवर्तन घडवून आणले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विचार मांडला आणि लाखो लोकांना प्रेरणा दिली. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद यांसारख्या महान व्यक्तींनी आपल्या विचारांमधून समाजाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांची नाळ मानवता, समानता, शिक्षण, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाशी जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देत आहे. आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञानाचे आहे. एका क्लिकवर जगभरातील माहिती उपलब्ध होते. मात्र माहितीचा प्रचंड साठा म्हणजे शहाणपण असे नाही. योग्य विचारांची निवड करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची आहे. सामाजिक माध्यमांवर अनेक अफवा, चुकीची माहिती आणि द्वेष पसरवणारे संदेश मोठ्या प्रमाणात फिरत असतात. अशा वेळी विवेकबुद्धी जागी ठेवून सत्य-असत्याची पडताळणी करणे हीच विचारांच्या नाळेची खरी कसोटी आहे. विचार न करता कोणतीही गोष्ट स्वीकारणे किंवा पुढे पाठवणे समाजासाठी घातक ठरू शकते. विचारांची नाळ ही केवळ स्वतः पुरती नसावी; ती समाजाशी जोडलेली असावी. आपल्या कृतीमुळे दुसऱ्याचे नुकसान होणार नाही, समाजात सौहार्द टिकेल, पर्यावरणाचे रक्षण होईल आणि देशाच्या विकासाला हातभार लागेल, असा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.स्वार्थापेक्षा परमार्थ मोठा मानणारी विचारसरणीच समाजाला एकत्र ठेवते. माणुसकी, सहिष्णुता, बंधुता आणि परस्पर आदर या मूल्यांवर उभी राहणारी विचारांची नाळच खऱ्या अर्थाने समाजाला मजबूत करते. विद्यार्थ्यांच्या जीवनात विचारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सकारात्मक विचार करणारा विद्यार्थी अपयश आले तरी खचत नाही. तो चुका स्वीकारतो, त्यातून शिकतो आणि नव्या जोमाने पुढे जातो. नकारात्मक विचार मात्र आत्मविशास कमी करतात आणि प्रगतीचे मार्ग बंद करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले साहित्य वाचणे, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास करणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे आणि सतत शिकत राहणे आवश्यक आहे. अशा सवयींमुळे विचारांची नाळ अधिक सक्षम बनते. समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, हिंसा, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता आणि नैतिक मूल्यांची घसरण ही विचारांच्या अधोगतीची चिन्हे आहेत. केवळ कायदे करून या समस्या सुटणार नाहीत. प्रत्येकाच्या मनात चांगल्या विचारांची बीजे पेरावी लागतील. घर, शाळा, महाविद्यालय, प्रसारमाध्यमे आणि सामाजिक संस्था यांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. विचार बदलले तर वर्तन बदलते आणि वर्तन बदलले तर समाजही बदलतो. चांगले विचार हे पुस्तकांतून, अनुभवांतून आणि सत्संगातून मिळतात. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ यांसारख्या संतांनी विचारांच्या माध्यमातून समाजाला नैतिकतेची आणि मानवतेची शिकवण दिली. त्यांच्या अभंगांमध्ये जीवनाचे गूढ उलगडणारे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. विचारांची नाळ आपल्या संस्कृतीशी जोडलेली राहिली, तर आधुनिकतेचा स्वीकार करतानाही आपण आपल्या मूल्यांचे रक्षण करू शकतो. आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे-माझ्या विचारांची नाळ कोणाशी जोडलेली आहे? स्वार्थाशी की समाजाशी? द्वेषाशी की प्रेमाशी? निराशेशी की आशेशी? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरेच आपल्या जीवनाचा मार्ग ठरवतील. कारण विचार हेच भविष्य घडवतात. जसे विचार, तसे निर्णय; जसे निर्णय, तसे जीवन. एकूणच, विचारांची नाळ ही व्यक्ती, समाज आणि राष्ट्राला जोडणारी जीवनवाहिनी आहे. सुदृढ विचारांमधून सुदृढ व्यक्तिमत्त्व घडते, सुदृढ व्यक्तिमत्त्वांमधून सक्षम समाज निर्माण होतो आणि सक्षम समाजातून प्रगत राष्ट्र उभे राहते. म्हणून प्रत्येकाने सकारात्मक, विधायक आणि मानवतावादी विचार जोपासले पाहिजेत. विचारांची नाळ जितकी सशक्त असेल तितके जीवन अधिक समृद्ध, अर्थपूर्ण आणि यशस्वी होईल.

# एक-दोन नव्हे, महिलेने दिला चक्क ४ बाळांना जन्म! घरातच झाली प्रसूती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** :बाळाचा जन्म कोणत्याही मातेसाठी आनंदाचा, कृतार्थतेचा क्षण असतो. कोणतीही विवाहिता मुलबाळ झाल्याशिवाय अपूर्ण अशी पारंपरिक समजूत. ती महिलाच काय संपूर्ण घर, परिवार आणि नातेवाईक हे देखील घरात बाळ जन्मला की आनंदाने हरखून जातात आपआपल्या कुवतीनुसार जल्लोष साजरा करतात.

**आदिवासी बहुल क्षेत्रातील अजब गजब घटना**

आता या बाळ जन्म पुराणाचे कारण देखील तितकेच मजेदार आहे. एखाद्या महिलेने जुळ्या मुलांना जन्म दिला तर ती अजूनही कुतूहल, कौतुकाची बाब ठरते. आजच्या संगणक आणि कृत्रिम बुद्धीमत्तेच्या काळातही हीच स्थिती आहे. महिलेने तीळ्यांना जन्म देणे तर आश्चर्य, धक्कादायक आणि चिकित्साचा विषय ठरतो. यामुळे एका महिलेने एकाच वेळी तब्बल चार बाळांना जन्मास घालणे ही तर वैद्यक क्षेत्रालाही दखल घेण्यास भाग पाडणारी घटना ठरणार हे उघड आहे. त्यातही चार मुलांचा जन्म घरातच झाल्याने वैद्यकीय क्षेत्र हादरने स्वाभाविक ठरते.

**चारबन ठरले लक्षवेधी**

जळगाव जामोद तालुक्यातील चारबन या आदिवासीबहुल चिमुकल्या गावात ही आश्चर्यकारक घटना घडली आहे. रियाणी पंशाराम सस्त्या (वय २७) या महिलेने घर-ातच झालेल्या मुदतपूर्व प्रसूतीमध्ये एकाच वेळी चार बाळांना जन्म दिला आहे. यामध्ये ३ मुले आणि १ मुलगी यांचा समावेश आहे. कोणत्याही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसताना




प्रतिकूल परिस्थितीत ही प्रसूती सुखरूपपणे पार पडल्याबद्दल वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनीही आश्चर्य व्यक्त केले आहे.

**सात लेकरांची आई!**

प्रसूतीनंतर मातेसह नवजात चारही बाळांना प्रारंभी जळगाव जामोद येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे.. प्राथमिक वैद्यकीय तपासणीत मातेसह बाळांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. मात्र प्रसूती मुदतपूर्व झाल्याने व नवजात बाळांचे वजन प्रत्येकी केवळ ९०० ग्रॅमच असल्याने अतिदक्षतेच्या आवश्यक उपचारासाठी माता व चारही बाळांना नंतर खामगाव येथील जिल्हा उप सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रियाणी सस्त्या या महिलेला याआधी २ मुली व १ मुलगा असून आता कुटुंबातील अपत्यांची संख्या एकूण ७ झाली आहे. त्यामुळे ती दोन तीन नव्हे तब्बल ७ पुत्रांची आई ठरली आहे. एकाच प्रसूतीमध्ये चार बाळांचा जन्म होण्याची घटना ही दुर्मिळ असल्याने लोकांमध्येही कुतूहल व्यक्त होत आहे. वैधकीय क्षेत्रातही कुतूहल निर्माण झाले आहे.

# बरे झाले अमित शहांचा राजीनामा मागितला नाही, अन्यथा आम्हाला गोळीच घातली असती, नागपूरच्या भारतने राहुल गांधींसमोर

दैनिक आपला विदर्भ





**नागपूर । प्रतिनिधी** : काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पुन्हा एकदा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लक्ष्य करत आंदोलक विद्यार्थ्यांविरोधात पोलिसांनी केलेल्या हिंसाचाराला तेच जबाबदार असल्याचा आरोप केला. विद्यार्थ्यांना कोणती वागणूक मिळाली याचा संसदेमध्ये खुलासा करण्यासाठी अमित शहा यांच्यामध्ये धाडस नाही, अशी टीकाही राहुल यांनी केली. या पत्रकार परिषदेत नागपूरचा भारत बानाइत उपस्थित होता. २० जुलै रोजी दिल्लीमध्ये झालेल्या लाठी हल्ल्यानंतर भारतचा व्हिडीओ सोशल मीडियावर सर्वत्र प्रसिद्ध झाला होता. या पत्रकार परिषदेत भारतनेही अमित शहांवर प्रखर टीका केली.

आम्ही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली म्हणून आमच्यावर इतकी कठोर कारवाई झाली. जर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली असती, तर कदाचित गोळी मारली असती, अशी टीका भारतने केली. वीस तारखेला घडलेला संपूर्ण प्रसंग भारत नाही यावेळी सांगितलं आम्ही विद्यार्थी असून देशातील शिक्षण व्यवस्था सुधरावे यासाठी प्रयत्न करत आहोत आम्हाला बोलण्याचा आणि आमचे विचार मांडण्याचाही अधिकार नसेल तर ही कसली लोकशाही असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

आपल्यावर हल्ला झाला, मारहाण केली आणि धमक्या दिल्या याची त्यांनी मला माहिती दिली. त्यांनी राज्यघटनेचे संरक्षण केले,ही आमची चूक होती का असेही भारत म्हणाला. तसेच आंदोलना त प्रामुख्याने भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भाजपच्या आयटी सेल कडून रोल केला जात असून धमक्या दिल्या जात असल्याचे आरोप केला.

'नीट' प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी दिल्लीमधील जंतर-मंतर येथे आंदोलन करणारे काही विद्यार्थी आणि आंदोलकांनी काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या १०, जनपथ या निवासस्थानी राहुल गांधींची भेट घेतली. त्यानंतर राहुल यांनी माध्यमांशी बोलताना अमित शहांवर शाब्दिक हल्लाबोल केला. पत्रकारांशी बोलताना राहुल यांनी सांगितले की, ''शिक्षण व्यवस्था सदोष, कोसळण्याच्या अवस्थेत असलेली आणि निरुपयोगी शिक्षण व्यवस्थेविरोधात तक्रार करणे गुन्हा नाही, असे राहुल गांधी यावेळी ठामपणे म्हणाले. ''ही व्यवस्था बदलण्याची, दुरुस्त करण्याची गरज आहे. हे विद्यार्थी तीच मागणी करत होते. ते कोणतीही हिंसा करत नव्हते, आक्रमक नव्हते किंवा खोडसाळपणा करत नव्हते. त्यांच्याकडे गुंड पाठवून त्यांच्याकडून माफी वदवून घेणे, १५ वर्षांच्या मुलीला माफी मागायला लावणे आणि ती स्वीकारणे हा वेडेपणा आहे आणि आम्हाला मान्य नाही,'' अशी टीका राहुल यांनी यावेळी केली.

# मुंबईतील मोकळ्या मैदानावर सत्ताधाऱ्यांचा डोळा; आदित्य ठाकरेंचा आंदोलनाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील सार्वजनिक मोकळ्या मैदानाचे खासगीकरण करण्याचा प्रयत्न सुरू केलाय, असा आरोप करण्यात येत आहे. मुंबईत त्यांनी पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, भाजपा सरकार शहरातील सार्वजनिक उद्यान आणि मैदान खासगी संस्थांकडे सोपवण्याचे धोरण राबवत आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

ऐतिहासिक मैदानावर बोली लावण्याची वेळ येऊ शकते : अंधेरी पश्चिम येथील सुमारे १६ एकर जागेचा उल्लेख करत, क्रिकेट मैदान कोणत्याही एका संस्थेची मालमत्ता नसून सर्वसामान्य नागरिकांसाठी आहे. मात्र ही जागा एका संस्थेला देण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही जागा एका संस्थांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप यावेळी आदित्य ठाकरेंनी केला. आज अंधेरी आणि प्रभादेवीतील मैदानावर डोळा आहे. तर उद्या शिवाजी पार्क किंवा ओव्हल मैदानासारख्या ऐतिहासिक मैदानावर बोली लावण्याची वेळ येऊ शकते, असा घणाघात यावेळी आदित्य ठाकरेंनी केला. याचबरोबर सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जागांचे खासगीकरण कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही : पुढे बोलताना ते म्हणाले की, मी कोणाच्याही संस्थेचे किंवा आमदाराचे नाव घेतलेले नाही. आमचा विरोध कोणत्याही व्यक्तीला नसून संपूर्ण प्रक्रियेला आहे. मुंबईच्या सार्वजनिक जागांचे खासगीकरण कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. त्या विरोधात लवकरच रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. मोर्चा कुठे आणि कधी काढायचा त्याची घोषणा योग्य वेळी करण्यात येईल, असंही आदित्य ठाकरे म्हणालेत. मुंबईत भाजपाचा महापौर झाल्यापासून ''नवी गाडी, नव घर, सगळेच नवं हवं'' अशी परिस्थिती दिसत आहे, असेही यावेळी आदित्य ठाकरे म्हणालेत. महापौर बंगल्याच्या नूतनीकरणासाठी तब्बल पाच कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र विरोध झाल्यावर हे टेंडर मागे घेण्यात आले, जनतेच्या पैशाचा चुकीचा वापर होऊ नये आणि तो होऊ देणार नाही, असेही यावेळी आदित्य ठाकरे म्हणालेत.

# अत्याधुनिक स्टुडिओमुळे मुंबई सर्जनशील अर्थव्यवस्थेचे जागतिक केंद्र बनेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : भारताला सर्जनशील अर्थव्यवस्थेचे (क्रिएटर इकॉनॉमी) जागतिक केंद्र बनविण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. गोरेगाव येथील फिल्मसिटी परिसरातील प्राइम फोकसच्या नव्या अत्याधुनिक स्टुडिओमुळे या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून, मुंबई सर्जनशील उद्योगांचे जागतिक केंद्र म्हणून अधिक सक्षम होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

फिल्मसिटी परिसरात प्राइम फोकसच्या जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक स्टुडिओच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाचे सचिव चंचल कुमार, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, दादासाहेब फाळके चित्रपट नगरी (फिल्मसिटी) च्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे – पाटील तसेच प्राइम फोकस समूहाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईत जागतिक दर्जाची सुविधा उभारून जगभरातील मनोरंजन आणि सर्जनशील उद्योगांना सेवा देण्याचा प्राइम फोकसचा



संकल्प आज प्रत्यक्षात उतरला आहे. शासनाने हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य केल्याचे सांगून 'वेव्हस २०२५' परिषदेदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर अवघ्या एका वर्षात या प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला, ही उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासामध्ये असंख्य प्रेरणादायी कथा दडलेल्या आहेत. या कथा जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सक्षम सर्जनशील परिसंस्थेची गरज आहे. प्राइम फोकसची ही सुविधा त्या दृष्टीने देशासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

जगातील सर्वात मोठ्या चित्रपट सहनिर्मिती प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'रामायण' चित्रपटाची निर्मिती या स्टुडिओमध्ये होत असल्याचा विशेष उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या चित्रपटाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. भारतीय सर्जनशीलतेचा जागतिक स्तरावरील उत्कृष्ट नमुना म्हणून हा चित्रपट ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

युवा पिढीच्या सर्जनशील क्षमतेला वाव देणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे आणि मनोरंजन उद्योगासाठी सक्षम परिसंस्था उभारणे यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. फिल्मसिटीचे जागतिक दर्जाच्या सर्जनशील आणि मनोरंजन केंद्रामध्ये रूपांतर करण्याचा व्यापक पुनर्विकास आराखडाही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रभावी संगम – आशिष शेलार**

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी प्राइम फोकसच्या उपक्रमाचे कौतुक करताना, संस्कृती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रभावी संगम या प्रकल्पातून साकार झाल्याचे सांगितले. सांस्कृतिक कार्य तसेच माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इलेक्ट्रॉनिक्स या दोन्ही विभागांची जबाबदारी स्वीकारल्यानंतर प्राइम फोकसच्या या परिसरात संस्कृती आणि तंत्रज्ञान एकत्र येऊन समाजासाठी मूल्यनिर्मिती करणारे आदर्श उदाहरण पाहायला मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. 'रामायण' चित्रपटाच्या ट्रेलरचा उल्लेख करताना मंत्री शेलार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'ऑरेंज इकॉनॉमी'च्या संकल्पनेला प्राइम फोकसने प्रत्यक्ष आकार देण्याचे काम केले असल्याचे सांगितले. सर्जनशीलता, सांस्कृतिक समृद्धी आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून देशासाठी नवे मानदंड निर्माण करणाऱ्या या उपक्रमासाठी त्यांनी प्राइम फोकसच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यात सर्जनशील उद्योगांना नवी चालना मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी 'वेव्हस २०२५' परिषदेदरम्यान महाराष्ट्र शासन आणि प्राइम फोकस यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराचा उल्लेख करत त्या कराराचेच हे फलित असल्याचे सांगून या माध्यमातून मुंबईत जागतिक दर्जाची सुविधा उभी राहिल्याचे नमूद केले. भारताकडे सर्जनशील आणि क्रिएटर इकॉनॉमी क्षेत्रात जगातील सर्वाधिक प्रतिभा, कल्पकता आणि समृद्ध कथाकथन परंपरा असल्याचे सांगून त्यांनी या सामर्थ्याच्या बळावर भारताला ऑरेंज इकॉनॉमीमध्ये जागतिक नेतृत्व मिळविण्याची क्षमता असल्याचा विश्वास व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने अल्पावधीत आवश्यक मंजुरी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हा प्रकल्प साकार होऊ शकल्याचे त्यांनी सांगितले. 'वेव्हस २०२५' दरम्यान जाहीर झालेल्या इतर गुंतवणूक आणि विकासविषयक वचनबद्धताही लवकरच प्रत्यक्षात उतरून त्याचा लाभ देशाच्या अर्थव्यवस्थेला होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्राइम फोकसचे नमित मल्होत्रा यांनी मनोगतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन आणि फिल्मसिटी प्रशासनाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मुंबईतील हा प्रकल्प प्राइम फोकसचे जागतिक मुख्यालय असून भारतीय म्हणून आणि मुंबईकर म्हणून तो अभिमानाचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत जगातील सर्वोत्तम दर्जाची सुविधा उभारण्याचा संकल्प करण्यात आला आणि राज्य शासनाच्या पाठबळामुळे तो प्रत्यक्षात साकार झाला असल्याचे त्यांनी सांगितले. प्राइम फोकसच्या पहिल्या टप्प्याच्या यशानंतर दुसरा टप्पाही लवकरच पूर्ण करून भारताला जागतिक मनोरंजन आणि सर्जनशील उद्योग क्षेत्रात अग्रस्थान मिळवून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनीही प्राइम फोकसच्या जागतिक दर्जाच्या सुविधेचे कौतुक करताना, 'वेव्हस २०२५' परिषदेदरम्यान झालेल्या सामंजस्य करारानंतर अल्पावधीत हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाल्याचे सांगितले. नमित मल्होत्रा आणि त्यांच्या संपूर्ण चमूने उभारलेली ही सुविधा केवळ देशातीलच नव्हे तर जगातील सर्वोत्तम सर्जनशील सामग्री निर्मिती केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमापूर्वी फिल्मसिटीच्या प्रशासकीय कार्यालय परिसरातील दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्याचबरोबर एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### ज्येष्ठ साहित्यिक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या निधनाने साहित्य क्षेत्राची न भरुन येणारी हानी उपसभापती सचिन अहिर



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ मराठी साहित्यिक, संपादक व अभ्यासक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या निधनाबद्दल विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

अनाथ विद्यार्थी आश्रमात शिक्षण घेत अत्यंत संघर्षमय वातावरणात घडलेल्या श्रीनिवास कुलकर्णी यांचे मराठी साहित्यातील योगदान चिरंतन टिकणारे आहे. 'डोह', 'सोन्याचा पिंपळ' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या अजरामर साहित्यकृती तसेच मौज प्रकाशनाचे संपादक म्हणून त्यांनी बजावलेली कामगिरी कायम स्मरणात राहील. त्यांना राज्य शासनाच्या मानाच्या 'विंदा करंदीकर जीवनगौरव' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते.

त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वाची न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली असून, ईश्वर त्यांच्या सर्व वाचक, अभ्यासक व आप्तजनांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना उपसभापती सचिन अहिर यांनी केली आहे.

### राज्यपालांच्या हस्ते अनंत कान्हेरे यांचेवरील पुस्तकाचे प्रकाशन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** 'अनंत कान्हेरे : द बुलेट दॅट अवोक भारत' या क्रांतिकारक अनंत कान्हेरे यांच्या जीवनावरील इंग्रजी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते लोकभवन मुंबई येथे संपन्न झाले. अनंत कान्हेरे यांच्यावरील प्रा. डॉ. म. बा. कुलकर्णी यांच्या मूळ मराठी पुस्तकाचा सदर पुस्तक अनुवाद आहे.

देशाच्या स्वातंर्त्य लढ्यात सत्याग्रह चळवळीसोबतच क्रांतिकारी राष्ट्रवादाची एक प्रभावी विचारधारा होती. या क्रांतिकारकांचे स्वातंर्त्यलढ्यातील योगदान अपेक्षित प्रमाणात गौरविले गेलेले नाही. अशा अज्ञात क्रांतिकारकांचे जीवन, कार्य आणि त्याग यांचे दस्तऐवजीकरण स्वतंत्र लघु पुस्तकांच्या मालिकेद्वारे व्हावे, जेणेकरून नव्या पिढीला भारतीय स्वातंर्त्यलढ्याचे समग्र आकलन होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

क्रांतिकारकांवरील पुस्तके मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनुवादित व्हावी असेही राज्यपालांनी सांगितले. भाषांतर हे भाषा आणि प्रदेश यांमधील दुवा म्हणून कार्य करते. त्यामुळे या राष्ट्रनायकांच्या प्रेरणादायी कथा देशभरातील जनतेपर्यंत पोहोचतील आणि सर्वांना प्रेरणा देतील, असे त्यांनी सांगितले. प्रकाशन सोहळ्याला भारतीय विचार साधना संस्थेचे अध्यक्ष डॉ गिरीश आफळे, जयेश क्षेमकल्याणी, अनुवादक चिन्मय खेडेकर, रवींद्र संघवी तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

### मराठी साहित्य विश्वातील संवेदनशील शब्दसाधक हरपला – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यिक 'श्रीनिवास विनायक कुलकर्णी ऊर्फ 'श्रीवि' यांच्या निधनाने मराठी साहित्यविश्वाने एक संवेदनशील, अभ्यासू शब्दसाधक गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, ग्रामीण मातीत रुजलेली संवेदनशीलता, निसर्गाविषयीची आत्मीयता आणि सामान्य माणसाच्या भावविश्वाचा वेध घेणारी विलक्षण लेखनशैली ही 'श्रीवि' यांच्या साहित्याची खरी ओळख होती. औदुंबरच्या भूम ीशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते त्यांच्या लेखणीतून कायम जिवंत राहिले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून मराठी भाषेचे सौंदर्य आणि जीवनाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाचकांना अनुभवायला मिळाली. 'मौज'सारख्या प्रतिष्ठित नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनी मराठी साहित्याला नवे लेखक, नवे विचार आणि नवे साहित्यिक प्रवाह दिले. अनेक नवोदित लेखकांना त्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि दर्जेदार साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन दिले.

श्रीनिवास कुलकर्णी यांचे साहित्य हे पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यांच्या निधनामुळे मराठी साहित्यविश्वाने एक मार्गदर्शक, संपादक आणि सर्जनशील विचारवंत गमावला आहे असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणतात.

# न्यायालयात 'विनयभंग' आणि 'असहाय महिला' यांसारख्या शब्दांवर बंदी; न्यायाधीशांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय न्यायालयांना कालबाह्य मानसिकता आणि पूर्वग्रहांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या एका महत्त्वपूर्ण समितीने ऐतिहासिक पाऊल उचललंय. 'नॅशनल ज्युडिशिअल अकादमी'ने स्थापन केलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित खटल्यांसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केलीत. ७४ पानांच्या या विशेष अहवालात देशभरातील न्यायाधीशांना सल्ला देण्यात आला आहे की, न्यायालयीन कामकाज आणि निकालांमध्ये महिलांचा उल्लेख करताना त्यांनी आदरपूर्ण, साधी आणि कायदेशीरदृष्ट्या अचूक भाषा वापरावी.

न्यायालयांमध्ये वापरली जाणारी भाषा निष्पक्ष न्याय आणि पीडितेची प्रतिष्ठेशी निगडित : अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका वादग्रस्त निकालाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतल्यानंतर हा अहवाल तयार करण्यात आला. यात नमूद केले आहे की, न्यायालयांमध्ये वापरली जाणारी भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून ती निष्पक्ष न्याय आणि पीडितेची प्रतिष्ठा यांच्याशी निगडित आहे. न्यायाधीशांच्या असंवेदनशील टिप्पणीमुळे पीडितांना अधिक मानसिक आघात सहन करावा लागतो आणि त्यामुळे समाजातील लोकांना गुन्ह्यांविरुद्ध आवाज उठवण्यापासून परावृत्त केले जाते.

चारित्र्य आणि नैतिकतेबाबतच्या टिप्पणींवर पूर्ण बंदी : तज्ज्ञ समितीने कनिष्ठ न्यायालयांच्या १२५ निकालांची तपासणी केली. त्यात असे आढळून आले की, कालबाह्य शब्द आणि अप्रत्यक्षपणे पीडितेलाच दोष देणारी भाषा अजूनही वापरली जात आहे. नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, न्यायाधीश आता पीडितेचे कपडे, आवडीनिवडी, जीवनशैली किंवा चारित्र्य यांवर आधारित टिप्पणी करू शकत नाहीत. तसेच पोलीस तक्रार दाखल करण्यास झालेला विलंब किंवा शरीरावर दुखापतीच्या खुणा नसणे, या गोष्टी पीडितेचा दावा खोटा ठरवण्यासाठी आधार मानल्या जाणार नाहीत.

कालबाह्य शब्दांच्या जागी नवीन, योग्य शब्दांचा वापर : समितीने अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या काही आक्षेपार्ह शब्दांवर पूर्ण बंदी घातली असून त्यांच्या जागी नवीन शब्द सुचवले आहेत. ProsecutriX (फिर्यादी महिला): न्यायालयीन निकालांमध्ये या क्लिष्ट शब्दाऐवजी आता 'सर्व्हायव्हर' – अत्याचारातून वाचलेली व्यक्ती), 'कम्प्लेनंट' (complainant – तक्रारदार) किंवा 'व्हिक्टिम' (victim – पीडित) हे शब्द वापरले जातील. 'Violation of modesty' (विनयभंग): या जुन्या वाक्प्रचाराऐवजी आता 'Violation of bodily autonomy' (शारीरिक स्वायत्ततेचे उल्लंघन) हा शब्दप्रयोग केला जाईल.

दया निर्माण करणाऱ्या शब्दांवर बंदी : 'Poor minor' (बिचारी अल्पवयीन) किंवा (असहाय महिला): दया निर्माण करणाऱ्या शब्दांवर बंदी घालण्यात आली आहे; त्याऐवजी (महिला) किंवा 'child survivor' (अत्याचारातून वाचलेले बालक) हे शब्द वापरले जातील. 'Lust' (वासना): 'Victim of lust' (वासनेची बळी) यांसारख्या वाक्प्रचारांऐवजी 'seXual harassment' (लैंगिक छळ) किंवा 'seXual violence' (लैंगिक हिंसाचार) यांसारखे थेट शब्द वापरले जातील. 'सन्मान' आणि 'अपमान': 'स्त्रीचा सन्मान लुटणे' किंवा



'कुटुंबाची प्रतिष्ठा' अशा शब्दांचा वापर करण्याऐवजी, आता केवळ पीडितेचे हक्क आणि तिला झालेली हानी यांवरच लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

'उद्ध्वस्त झालेले आयुष्य': निकालामध्ये 'मुलीचे आयुष्य उध्वस्त झाले आहे' असे नमूद करण्याऐवजी, आता पीडितेची 'मानसिक आघात' आणि तिला आवश्यक असलेल्या आधारावर भर दिला जाईल.

पीडितांच्या संरक्षणासाठी न्यायालयांना निर्देश : सुनावणीदरम्यान पीडितांना पुन्हा भीती आणि धक्क्याचा सामना करावा लागू नये, यासाठी न्यायालयीन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आलेत. अशा प्रकरणांची सुनावणी आता 'इन कॅमेरा' (बंद दाराआड) घेतली जाणार आहे. न्यायालयात पडदे किंवा आडोसा लावला जाईल, जेणेकरून साक्ष देताना पीडितेला आरोपीचा सामना करावा लागणार नाही. बचावाच्या वकिलांनी विचारलेले कोणतेही अपमानजनक प्रश्न थांबवण्यासाठी न्यायाधीश त्वरित हस्तक्षेप करतील. सर्वोच्च न्यायालयाचे हे पाऊल देशातील न्यायव्यवस्था महिलांसाठी अधिक सुरक्षित आणि न्याय्य बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे.

## एकनाथ शिंदे तुमच्या एवढ्या सीट पाडेन की तुम्हाला पश्चाताप होईल, तुमच्यापेक्षा उद्धव ठाकरे बरे; मनोज जरांगे पाटलांची आगपाखड

दैनिक आपला विदर्भ

**जालना । प्रतिनिधी :** भुमरेमामा तुम्ही सहाव्या नंबरवर होता. तुम्हाला निवडून आणण्यासाठी मराठ्यांच्या पोरांनी काम केलं. पण तुम्ही आमचाच मामा करायला निघाला. तुम्ही मराठ्यांचं नुकसान करणार असाल तर शिंदेंच्या सगळ्या सीट आम्ही पाडणार. शिंदे साहेबांची मी इतकी सीट पाडणार की त्यांना आयुष्यात पश्चाताप होईल, झोपून टाकील मी सगळे सीट. एकनाथ शिंदे आपण जीवाभावाचे आहात. त्यातून आम्ही तुमचं काम करत होतो. पण तुम्ही माझ्याचविरोधात फिरलात. तुमचा गद्दारीचा डाग आम्ही पुसणार होतो, पण तुम्ही धोका दिला. असा घणाघाती आरोप करत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला मिळालेल्या कुणबी प्रमाणपत्रांमुळे ओबीसी आरक्षणाचा मार्ग खुला झाला. मात्र आता त्याच प्रमाणपत्रांवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागलंय. मराठवाड्यात कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची जात वैधता पडताळणी समितीने रद्द केल्यानंतर मनोज जरांगे



पाटील यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

शरद पवार साहेब म्हातारे झाले आहेत. त्यामुळे अजितदादा आणि एकनाथ शिंदे यांना मराठे तुटून मतदान करत होते. शिंदे साहेब तुम्ही उपकाराची परतफेड कराल असं वाटलं होते. आम्ही झोकून काम केलं. निवडणुकीला तुमच्याकडून कुणी पैसे घेतले असतील तर दाखवून द्या. फडणवीस साहेब मराठ्यांच्या जीवावर सत्तेत बसले आहेत. त्यामुळे सगळं बाहेर काढायला लावू नका, असा इशारा देखील मनोज जरांगे यांनी सरकारला दिला आहे. एकनाथ शिंदेंसाठी आम्ही खूप खस्ता खाल्लयात, पण तुम्ही तर आमची नरडी कापायला लागला. तुमचा गद्दारीचा डाग आम्ही पुसणार होतो. पण तुम्ही सत्तेत गेलात म्हणून आमच्यावर माज उतरावणार का? शिंदे साहेब तुम्ही डबल गेम खेळतात का? आता उद्धव ठाकरे बरा म्हणायची वेळ आलीय. असेही मनोज जरांगे म्हणाले.

चंद्रशेखर बावनकुळेंच्या सांगण्यावरुन मराठ्यांची प्रमाणपत्र रद्द करत आहेत. बावनकुळे इतके मोठे झाले का? फडणवीसांनी बावनकुळेंना एवढे अधिकार दिले का? फडणवीस तुम्ही उगाच मराठ्यांना अंगावर घेतलंय. अशी टीकाही मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. शिंदे साहेब मी तुम्हाला उघडं पाडू शकतो, २५-३० तुमचे आणि बावनकुळेंमुळे फडणवीसांचे २५ ते ३० आमदार घालवू शकतो. शिंदेसाहेब मराठ्यांचा घात करायचा नाही, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

प्रसाद लाड मरमर करत आहे. मात्र यांनी वाटोळ करायचं ठरवलं असेल तर ते काय करतील. विखे पाटील आणि प्रसाद लाड यांना मी तीनदा-चारदा सांगितले आहे. उदय सामंत साहेबांनाही सांगितलंय, मग फडणवीस यांचा हा डाव आहे का? त्यांना बावनकुळे ऐकत नाही का? फडणवीस साहेब डोक्यातील हवा काढा. आमचा हैद्राबाद गॅजेटचा जीआर बोगस आहे तर १९९६ चा देखील बोगसच आहे. असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## आयुष्यमान भारत आणि जनआरोग्य योजनेतील गैरव्यवहारांप्रकरणी एसआयटी

**मुंबई । प्रतिनिधी :** आयुष्मान भारत-पंतप्रधान जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये तब्बल १५ हजार ४०७ उपचारांचे दावे संशयास्पद आढळल्याने या संपूर्ण गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने विशेष चौकशी पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली हे उच्चस्तरीय पथक गठीत करण्यात आले असून, एका महिन्याच्या आत सविस्तर चौकशी अहवाल सरकारला सादर करण्याचे आदेश या एसआयटीला देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै रोजी विधानभवनात पार पडलेल्या आढावा बैठकीत या दोन्ही आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला होता. त्यावेळी भाजप आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यासह इतर भागांत महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराचा आणि बोगस दाव्यांचा मुद्दा उपस्थित केला होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्र्यांनी एसआयटीमार्फत चौकशी करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार गृह व सार्वजनिक आरोग्य विभागाने यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

आरोग्य विभागाने २०२४ ते २०२६ या कालावधीत दाखल झालेल्या दाव्यांची प्राथमिक तपासणी केली असता, तब्बल १५ हजार ४०७ उपचारदावे संशयित असल्याचे समोर आले. सुरुवातीला जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, या कथित घोटाळ्याची व्याप्ती आणि साखळी एकाच जिल्ह्यापुरती मर्यादित नसून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पसरल्याचे स्पष्ट झाल्याने शासनाने स्वतंत्र एसआयटी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला. 'एसआयटी'त कोणाचा समावेश? डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखालील या एसआयटीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक शहर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि नाशिक शहर आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. तर आरोग्य विभागाचे उपसचिव हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

### आकांक्षा चमोलानं लॉक अप २च्या एलिमिनेशननंतर गौरव खन्नासोबत घटस्फोट घेणार असल्याची केली पुष्टी

हैदराबाद : टीव्ही अभिनेत्री आकांक्षा चमोलानं तिचा पती आणि प्रसिद्ध अभिनेता गौरव खन्नापासून घटस्फोट घेण्याची घोषणा केल्यामुळं ती अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. अभिनेत्रीनं लॉक अप सीझन २ या रिॲलिटी शोदरम्यान हा खुलासा केला होता. या स्पर्धेत बराच काळ टिकून राहिल्यानंतर, ती अंतिम फेरीपूर्वीच स्पर्धेतून बाहेर पडली आहे. बाहेर पडल्यावर तिनं पती गौरव खन्नासोबतच्या घटस्फोटाबाबत आपली पहिली प्रतिक्रिया दिली. आकांक्षानं स्पष्ट केलं की, तिनं हे विधान टीआरपीसाठी केले नव्हते आणि ती खरोखरच घटस्फोटाची प्रक्रिया पूर्ण करत आहे. टीआरपीसाठी हे केले नाही जेव्हा तिला विचारण्यात आलं की लोक असा दावा करत आहेत की, तिनं केवळ शोचा टीआरपी वाढवण्यासाठी घटस्फोटाचा उल्लेख केला, तेव्हा अभिनेत्रीनं म्हटलं, ''बघा, माझ्या पतीपासून घटस्फोट घेण्याबाबत मी इतक्या मोठ्या शोमध्ये खोटे का बोलेन? मी हे टीआरपी किंवा प्रसिद्धीसाठी केले नाही. माझ्या घरी या आणि माझ्या कायदेशीर टीमला भेटा. आता मी शोमधून बाहेर आले आहे, तेव्हा आम्ही यावर चर्चा करत आहोत.

# महाडीबीटीवर अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज सुरू; नोंदणीला सुरुवात

## महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत मंजूर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नव्याने विकसित करण्यात आलेल्या महाडीबीटी २.० प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याची सुविधा दि. ६ जुलै २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयांनी विहित कार्यपद्धतीनुसार अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

महाडीबीटी २.० पोर्टलवर भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संलग्न वसतिगृहातील व वसतिगृहाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता या योजनांसाठी नवीन तसेच नूतनीकरणाचे अर्ज स्वीकारले जात आहेत.

विद्यार्थ्यांनी महाआयडी नव्याने तयार करणे बंधनकारक असून त्यासाठी स्वतःचा आधार क्रमांक वापरणे आवश्यक आहे. आधारवरील पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवावी. तसेच जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, अधिवास दाखला, गुणपत्रिका आदी आवश्यक कागदपत्रांची पीडीएफ प्रत तयार ठेवून महाआयडीद्वारे लॉगिन करून अर्ज सादर करावा. अर्जाची पीडीएफ अथवा प्रिंट जतन करून ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

महाविद्यालयांसाठीही विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. महाविद्यालयांनी




केवळ प्राचार्यांच्या लॉगिनद्वारे प्रणालीचा वापर करावा. अभ्यासक्रमनिहाय शुल्क रचना अद्ययावत करून पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित न ठेवता विहित मुदतीत तपासून मंजूर करून पुढे पाठविण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहणार आहे. तसेच अनुसूचित जातीच्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क आकारू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालयांनी आपल्या संस्थेची व अभ्यासक्रमांची माहिती, शुल्क रचना आणि मान्यतेसंबंधी तपशील संबंधित शैक्षणिक यंत्रणेमार्फत महाडीबीटी २.० पोर्टलवर अद्ययावत करून घ्यावा.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आपल्या संस्थेत प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व इतर योजनांचे अर्ज अनिवार्यपणे भरून घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. अन्यथा पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची वैयक्तिक जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील, असा इशाराही समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी दिला आहे.

# बुलढाण्यातील माईस प्रकल्प आणि सिंदखेड राजा येथील जिजाऊ सृष्टी उभारणीला गती देणार : मंत्री शंभूराज देसाई

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील हातणी व वळती येथील माईस प्रकल्पाबरोबरच सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळाच्या ऐतिहासिक महत्वाला साजेशी जिजाऊ सृष्टी उभारण्याच्या प्रस्तावाला गती देण्यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करेल. या दोन्ही प्रकल्पांमुळे विदर्भातील पर्यटनाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

मंत्रालयात बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील मौजे हातणी व वळती येथील प्रस्तावित माईस (मीटिंग्ज, इन्सेटिव्ह, कॉन्फरन्स अँड एक्झीबिशन) प्रकल्प तसेच शिवसृष्टी उभारणी आणि सिंदखेड राजा येथील प्रस्तावित जिजाऊ सृष्टीसंदर्भात आढावा बैठक पार पडली.

बैठकीस राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री



मकरंद आबा पाटील, आमदार श्वेता महाले, आमदार मनोज कायंदे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, सहाय्यक संचालक रवींद्र पवार तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.प्रवीणकुमार देवरे , निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपवनसंरक्षक, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत हातणी व वळती येथील प्रस्तावित माईस प्रकल्पासाठी आवश्यक जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याबाबत बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच प्रकल्पाचा मास्टर प्लॅन, वास्तुरचना, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि खर्चाचा अंदाज तातडीने तयार करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. प्रकल्पासाठी आवश्यक आर्थिक तरतूद, निधी नियोजन तसेच पुढील अंमलबजावणीच्या आराखड्यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय, सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तावित मातृतीर्थ जिजाऊ सृष्टी उभारण्याबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सिंदखेड राजा येथील राजमाता जिजाऊ जन्मस्थळ विकास आराखड्याअंतर्गत यापूर्वी विविध संवर्धन व जतनाची कामे पूर्ण करण्यात आली असून, या ऐतिहासिक स्थळाला अधिक आकर्षक, अभ्यासपूर्ण आणि पर्यटनदृष्ट्या सक्षम स्वरूप देण्याच्या दृष्टीने जिजाऊ सृष्टी विकसित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

या प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव सादर करून मान्यता मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. अंतिम निर्णयानंतर बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्या समन्वयाने पर्यटन विभागाशी संबंधित सर्व कामांचे नियोजन, सविस्तर आराखडा, आवश्यक निधीची तरतूद आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येईल.

राजमाता जिजाऊंचा प्रेरणादायी इतिहास, वारसा आणि सांस्कृतिक वैभव आधुनिक माध्यमांतून पर्यटकांसमोर प्रभावीपणे उभे करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## वृत्तविशेष...

### विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमात बदल, गृहभेटीची मोहीम १७ ऑगस्टपर्यंत; अंतिम मतदार यादी आता २७ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकात सुधारणा केली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार बूथ लेव्हल अधिकारी यांच्यामार्फत घरोघरी भेटीचा कार्यक्रम ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार यांनी दिली.

मतदार यादीचा प्रारूप मसुदा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केला जाईल. त्यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी आणि निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडेल. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, असे भारत निवडणूक आयोग मार्फत कळविण्यात आले आहे.

### जिल्हास्तरीय कार्यशाळेत नव्या क्रीडा स्पर्धा प्रणालीचे प्रशिक्षण

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२६-२७ पासून शालेय क्रीडा स्पर्धांसाठी लागू करण्यात येणाऱ्या नव्या तंत्रज्ञानाधारित प्रणालीबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत बुलढाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील सुमारे ६५० शारीरिक शिक्षण शिक्षक व संगणक चालकांनी सहभाग नोंदविला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर तसेच तालुका संयोजक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व. मेजर ध्यानचंद, ऑलिम्पियन खाशाबा जाधव आणि बॅरन पियरे द कुबर्टीन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथींचा सत्कारही करण्यात आला.

प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. सन २०२६-२७ मधील क्रीडा स्पर्धांचे नियोजन, आयोजन तसेच नव्या ऑनलाइन तंत्रज्ञान प्रणालीचा वापर याबाबत उज्वला लांडगे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांच्या विविध शंकांचे निरसनही करण्यात आले. सकाळ व दुपार अशा दोन सत्रांत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत नव्या तंत्रज्ञान प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जीवन मोहोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन संदीप केळे यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद गायकवाड, सागर इंगळे आणि सुहास राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

### १ लाखांहून अधिक अमराठी चालकांनी गिरवले व्यवहारिक मराठीचे धडे – मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रात रोजगार करायचा असेल, तर मराठीशी नाळ जोडलीच पाहिजे. ही सक्तीची नव्हे, तर आपुलकीची भाषा आहे. प्रवाशांशी दोन प्रेमाचे शब्द मराठीत बोलणारा प्रत्येक चालक हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सन्मान करणारा दूत ठरतो,'' अशा भावनिक शब्दांत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी शिकवणी अभियानाला' मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. या अभियानाअंतर्गत राज्यभरातील १ लाखांहून अधिक अमराठी व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांनी व्यवहारिक मराठीचे धडे यशस्वीरित्या पूर्ण केले असून, उर्वरित चालकांनीही १५ ऑगस्टपूर्वी या संधीचा लाभ घेऊन मराठी शिकावे, असे आवाहन त्यांनी केले.

या अभियानाच्या आढावा बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवळ, मुंबई मराठी साहित्य संघ तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, ''मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. येथे उपजीविका करणाऱ्या प्रत्येकाने मराठीचा सन्मान करावा, हा आमचा प्रामाणिक आग्रह आहे. प्रवाशांशी संवाद साधताना मराठीचा वापर झाला, तर केवळ व्यवहार सुलभ होणार नाही, तर माणसामाणसांमधील आपुलकीचे बंधही अधिक दृढ होतील.''

ते पुढे म्हणाले की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर तिच्या गौरवासाठी राबविण्यात आलेल्या या अभियानाला लाखो अमराठी बांधवांनी सकारात्मक आणि सन्मानपूर्वक प्रतिसाद दिला आहे. मराठी शिकण्याचा त्यांचा हा स्वयंस्फूर्त सहभाग म्हणजे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मराठीप्रेमाला वाहिलेली खरी आदरांजली आहे.

## देशातील शिक्षण व्यवस्था सुधारणार; अभिजीत दिपके यांचा पुन्हा एकदा एल्गार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर विविध विषयांवरुन जोरदार टीका केली. शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, न्यायालयीन व्यवस्था यावरुन सरकारवर निशाणा साधला. लोकांच्या समस्या जाणून घेणार – आम्हाला देशातील शिक्षण व्यवस्था सुधारायची आहे. 'क्या बोलती पब्लिक' कॅम्पेन सुरू करणार आहोत. आम्ही देशभरातील लोकांच्या समस्या जाणून घेणार आहोत, अशी माहिती अभिजीत दिपके यांनी दिली.

न्यायालयाकडं वेळ नसतो – ''राजकीय व्यवस्थेवरचा विश्वास उडत आहे. सत्ताधारी पक्षाच्या बाजूनं न्यायव्यवस्थेचे निकाल येतात. उद्योगपतींच्या प्रकरणावर लवकर सुनावणी होते. कोर्टात जाऊन पक्ष चोरला जात आहे. सामान्यांच्या प्रकरणावर न्यायालयाकडं वेळ नसतो. लोकांचा मीडियावर राग आहे. मीडियानं त्यांना प्रश्न विचारणं बंद केलं आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला.

बेरोजगारीकडं तुम्ही आता दुर्लक्ष करू शकत नाही – ६० टक्के लोक ३५ वर्षाहून कमी वयाचे आहेत. जंतरमंतरवर बरोजगार देखील आले होते. नाईलाजानं अनेकांना डिलिव्हरी बॉय म्हणून काम करावे लागते. कमी पैशात घर चालवावे लागते. ८० टक्के बेरोजगारांकडे डिग्री आहे. त्यांना शिकून पश्चाताप वाटत आहे. ज्यांच्याकडं डिग्री नाही, ते सरकार चालवतात. आमचं भविष्य हे अशिक्षित लोक ठरवत आहेत. बेरोजगारीकडं तुम्ही आता दुर्लक्ष करू शकत नाही. दुर्लक्ष केले तर उाहँ दाखवून देईल. सगळ्या नागरी संस्थांना एकत्र करून नागरिक म्हणून एकत्र येत देशात सुधार आणण्याची गरज आहे. हा आमचा अजेंडा आहे, असं सांगत अभिजीत दिपके यांनी केंद्रावर हल्लाबोल केला.

## भाजपा नाही 'या' पक्षात शिंदेंची शिवसेना होणार विलीन? संजय राऊतांनी थेट नाव घेतलं

**मुंबई । प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण या पक्षचिन्हासंदर्भात बुधवारपासून सुनावणीला सुरुवात झालेली असतानाच आज सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार तथा पक्षप्रवक्ते संजय राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेमध्ये चलबिचल सुरु झाली असल्याचा दावा केला आहे. शिंदेंच्या शिवसेनेमध्ये विलिनिकरणाची चर्चा सुरु असल्याचा दावा राऊतांनी केला आहे. एवढ्यावरच न थांबता राऊत यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विलिनिकरणासाठी दोन पर्यायांची चाचपणी केली जात असल्याचाही दावा केलाय. भारतीय जनता पार्टीसोबतच विलिनिकरणासाठी शिंदे सेनेकडे अजून एक पर्याय असल्याचा दावा राऊतांकडून करण्यात आला आहे.

लोकशाहीवर दुरोगामी परिणाम

मूळ पक्ष फुटलेला नसल्याने शिवसेना पक्ष आणि चिन्ह आमच्याकडे राहील अशी बाजू आम्ही मांडली. आपल्यापुढे ऐतिहासिक खटला सुरु असल्याचं आणि या निर्णयाचा लोकशाहीवर दुरोगामी परिणाम होईल याची जाणीव कोर्टाला असल्याचं काल मला जाणवलं. त्यामुळे आम्ही निश्चिंत आहोत, असं राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना नमूद केलं आहे.

भाजपाबरोबरच शिंदे सेना या पक्षातही होऊ शकते विलीन

''आम्हाला खात्री आहे की ज्यांनी बेईमानी केली त्यांना आम्ही कायद्यानेच संपवू. माझी आजची माहिती अशी आहे की समोरच्या बाजूला चलबिचल सुरु झाली आहे. भारतीय जनता पार्टीमध्ये मर्ज व्हायचं की जो लहान पक्ष त्यांनी आपल्याच विलीन केलाय त्या 'प्रहार'मध्ये तृणमूलप्रमाणे विलीन व्हायचं त्यासंदर्भात त्यांच्याकडे खल सुरु आहे. लवकरच फुटीर गटाचे नेते दिल्लीला येतील आणि त्यांच्या पक्षाचे नेते अमित शाहांची चर्चा करतील,'' असं राऊत यांनी म्हटलं आहे. दबावाखाली निवडणूक आयोगाने दिलेला चुकीचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला तर महाराष्ट्रातील जनतेचा आणि लोकशाहीचा मोठा विजय असेल, असं राऊत यांनी नमूद केलं आहे.

भाजपाला पर्याय असल्याचा राऊतांनी दावा केलेला पक्ष कोणता?

प्रहार जनशक्ती पक्ष हा बच्चू कडूंचा पक्ष आहे. काही आठवड्यांपूर्वीच बच्चू कडू शिंदेंच्या शिवसेनेमध्ये सहभागी झाले आहेत. शेतकरी विकास, सामान्यांचे प्रश्न सोडवणे आणि दिव्यांग कल्याण या मुद्द्यावर हा पक्ष काम करतो असं बच्चू कडू सांगतात. या पक्षाची स्थापना १९९९ साली झाली आहे.


# मुक्या जीवासाठी पोलिसांची जीवाची बाजी; २०–२५ किमी थरारक पाठलागानंतर चोरीची गाय सुखरूप!

## खामगाव ग्रामीण पोलिसांची धाडसी कारवाई; ३५ हजारांची गाय व चोरीसाठी वापरलेली कार जप्त, चोरटे फरार

**दैनिक आपला विदर्भ**

**खामगाव । प्रतिनिधी :** जनावर म्हणजे शेतकऱ्याच्या कुटुंबातील एक सदस्यच. अशाच एका शेतकऱ्याच्या डोळ्यांसमोरून मध्यरात्री मुक्या जीवाची चोरी झाली; मात्र खामगाव ग्रामीण पोलिसांनी जीवाची पर्वा न करता केलेल्या धाडसी कारवाईमुळे त्या मुक्या जीवाला पुन्हा आपल्या मालकापर्यंत सुखरूप पोहोचवण्यात यश मिळाले.

बोरी अडगाव (ता. खामगाव) येथील बाळासाहेब रामराव टीकार (वय ४६) यांच्या मालकीच्या पाच गायी गोठ्यात बांधलेल्या होत्या. ५ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे जनावरांची देखभाल करून त्या गोठ्यात बांधल्या. मात्र मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी एमएच ३१ एफसी १७८८ क्रमांकाच्या टाटा कारमध्ये १० वर्षे वयाची पांढऱ्या बाहाळी रंगाची गाय जबरदस्तीने कोंबून पळवून नेली.







घटनेची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलिसांचे पथक तातडीने सक्रिय झाले. चालक कैलास हटकर आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुभाष रिंढे यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता बोरी अडगाव ते वाडेगावदरम्यान चोरट्यांच्या कारचा तब्बल २० ते २५ किलोमीटर थरारक पाठलाग केला. पोलिसांचा ससेमिरा लागल्याने चोरट्यांची गाळण उडाली. अखेर पोलिसांनी संशयित कार ताब्यात घेतली; मात्र अंधाराचा फायदा घेत चोरटे घटनास्थळावरून पसार झाले.

कारमध्ये अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून ठेवलेली ३५ हजार रुपये किमतीची गाय पोलिसांनी सुखरूप बाहेर काढून मालकाच्या ताब्यात दिली. मुक्या जीवाचे प्राण वाचल्याने शेतकरी कुटुंबाने सुटकेचा नि:श्वास सोडला. चोरीसाठी वापरलेली टाटा कारही पोलिसांनी जप्त केली आहे.

या प्रकरणी बाळासाहेब टीकार यांच्या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता () कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार किरण राऊत यांनी गुन्हा नोंदविला असून, पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळकृष्ण फुडकर पुढील तपास करत आहेत. फरार झालेल्या चोरट्यांचा शोध सुरू असून त्यांना लवकरच अटक होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

खामगाव ग्रामीण पोलिसांनी दाखविलेल्या तत्परता, धाडस आणि कर्तव्यदक्षतेमुळे एका मुक्या जीवाचा जीव वाचला आणि शेतकऱ्याच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.

# मानधनासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांचा एल्गार

## जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनमधील कर्मचाऱ्यांचा सरकारला इशारा; आठवडाभरात निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन गुरुवारी १५ व्या दिवशीही कायम राहिले. गेल्या ८ ते १० महिन्यांपासून थकीत असलेले मानधन तात्काळ अदा करावे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करावे, या प्रमुख मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलन





अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

राज्यभरातील सुमारे १,१३६ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन महिनोनमहिने रखडल्याने त्यांच्या कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. नियमितपणे शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आपल्या हक्काच्या मानधनासाठी आंदोलन करावे लागत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

आंदोलकांनी सांगितले की, वारंवार निवेदने आणि पाठपुरावा करूनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे या आठवड्यात थकीत मानधन अदा करून समायोजनाचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.